महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले** :- 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा.2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 17 मे, 2020
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 19 मे, 2020
6. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/235, दिनांक 21 मे, 2020
7. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 31 मे, 2020
8. या कार्यालयाचे आदेश क्रमांक दंडप्र-01/कावि/2020/265, दिनांक 31 मे, 2020
9. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्रालय मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दिनांक 25 जून, 2020

------0000------

क्र दंडप्र-01/कावि/2020/325 दिनांक 26 जून, 2020

## -: आदेश :-

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद या कार्यालयाकडील आदेश दिनांक 31 मे, 2020 अन्वये जळगांव जिल्हयाकरीता लॉकडाऊन कालावधी 30 जून, 2020 पावेतो वाढविण्यात आलेला असून शासनाकडील आदेश दिनांक 31 मे, 2020 मध्ये नमूद बाबी जळगांव जिल्हयाकरीता लागू करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद शासन आदेश दिनांक 25 जून, 2020 अन्वये उपोद्घातातील नमूद शासनाकडील आदेश दिनांक 31 मे, 2020 मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

त्याअर्थी, मी, **अभिजीत राऊत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन उपोद्घातात नमूद या कार्यालयाचे आदेश दिनांक 31 मे, 2020 मधील नमूद बाबी कायम ठेवून व उपोद्घातात नमूद शासनाकडील आदेश दिनांक 25 जून, 2020 मध्ये नमूद तरतुदींच्या अधिन राहून खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

A) शासन आदेश दिनांक 19 मे, 2020 अन्वये जळगांव शहर महानगरपालिका जळगांव हद्दीतील क्षेत्र हे **रेड झोन (Red Zone)** व जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कार्यक्षेत्र वगळता **जळगांव जिल्हयातील** इतर सर्व क्षेत्राचा समावेश हा **Non Red Zone** (Orange & Green Zone) मध्ये करण्यात आलेला असून या कार्यालयाचे आदेश दिनांक 21 मे, 2020 मध्ये नमूद केलेल्या बाबी कायम ठेवण्यात येत आहेत.

लॉकडाऊन कालावधीत लागू करण्यात आलेले निर्बंध शिथील करुन टप्प्याटप्प्याने काही बाबी सुरु करण्याच्या अनुषंगाने शासन आदेश दिनांक 31 मे, 2020 मधील परिच्छेद क्रमांक 06 मध्ये Phase-III नंतर **Phase-IV** चा समावेश करण्यात येत असून **दिनांक 28 जून, 2020 पासून जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे कार्यक्षेत्रातील सर्व सलून दुकाने, ब्युटी पार्लर, बार्बर शॉप सुरु करण्यात येत असून Prior appointments**

Scanned with CamScanner

**(अर्थात त्या ठिकाणी प्रतिक्षेत ग्राहक नसावेत) घेतलेल्या ग्राहकांना सेवा पुरविण्यासाठी खालील प्रमाणे नमूद अटी व शर्तींवर परवानगी देण्यात येत आहे.**

1) Haircut, dyeing hair, waxing, threading अशा प्रकारच्या सेवा देता येतील. त्वचेसंबंधित सेवा देता येणार नाहीत. असे दुकानात स्पष्टपणे प्रदर्शित करण्यात यावे.
2) दुकानात काम करणा-या कर्मचा-यांनी Protective gear लावण्यासह ग्लोव्हज, ॲप्रॉन व मास्कचा वापर करावा.
3) ग्राहकांस सेवा दिल्यानंतर सर्व कार्यक्षेत्रात (खुर्च्या) निर्जंतुकीकरण (Sanitize) करणे आवश्यक राहील. तसेच दुकानातील सामाईक भाग व फ्लोअर्स दर दोन तासांनी निर्जंतुकीकरण (Sanitize) करणे आवश्यक राहील.
4) Disposable towels / napkins चा वापर ग्राहकांवर करणे बंधनकारक राहील. सेवा देण्यापूर्वी व दिल्यानंतर Non-disposal सामुग्रींचे निर्जंतुकीकरण (Sanitize) करणे आवश्यक राहील.
5) वर नमूद सर्व सुचनांचे ठळक अक्षरात ग्राहकांना दिसतील असे फलक दुकानात लावण्यात यावेत.

**B)** शासन आदेश दिनांक 31 मे, 2020 मधील परिच्छेद क्रमांक 07 मध्ये Sub clause g चा समावेश करण्यात आलेला असून **जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे क्षेत्र वगळता जळगांव जिल्हयातील उर्वरीत क्षेत्रात दिनांक 27 जून, 2020 पासून सर्व सलून दुकाने, ब्युटी पार्लर, बार्बर शॉप सुरु करण्यासाठी वर नमूद अट क्रमांक 01 ते 05 लागू राहतील.**

सदरचा आदेश उपोद्घातात नमूद संदर्भ क्र. 9 महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 25 जून, 2020 सोबत वाचावेत.

**सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास सदर बाब ही भारतीय दंड संहिता, 1860 (45) चे कलम 188, आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 51 ते 60 तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.**

सदरचा आदेश हा आज दिनांक 26/06/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**सहपत्र : महाराष्ट्र शासन आदेश दिनांक 25 जून, 2020**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व / कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
7. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. मुख्याधिकारी सर्व (नगरपालिका/नगरपंचायत)
10. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था जळगांव

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे जिल्हयातील सर्व स्थानिक वर्तमानपत्रात विनामुल्य प्रसिध्दी देण्याबाबतची कार्यवाही करावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner